# राज्य कर्मचाऱ्यांना स्वत:चे गाव बदलण्याची सुवर्णसंधी

## स्वग्राम रजा सवलतीचा लाभ घेण्यासाठी नवीन नियम जारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. विवाह, कौटुंबिक कारणे, स्थलांतर, नैसर्गिक आपत्ती किंवा इतर वैयक्तिक अडचणींमुळे सेवाकाळात स्वतःचे घोषित केलेले स्वग्रामम बदलण्याची गरज भासणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता अतिरिक्त संधी मिळणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेत नियमांमध्ये सुधारणा केली आहे.

या निर्णयामुळे विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. लग्नानंतर बदललेल्या वास्तव्यासंदर्भात किंवा इतर वैयक्तिक कारणांमुळे स्वग्राम बदलण्याची गरज निर्माण झाल्यास त्यांना आता अधिकृतरीत्या बदल करता येणार आहे. त्यामुळे स्वग्राम रजा प्रवास सवलत आणि इतर सेवा सुविधांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.

**काय होते जुने नियम?**

सध्याच्या नियमांनुसार, शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांच्या आत प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले स्वग्राम घोषित करणे बंधनकारक होते. एकदा स्वग्राम घोषित केल्यानंतर सेवाकाळात केवळ एकदाच त्यामध्ये बदल करण्याची परवानगी होती. मात्र, अनेक कर्मचाऱ्यांनी विविध कारणांमुळे निर्धारित सहा महिन्यांच्या कालावधीनंतर स्वग्राम घोषित केले होते. अशा कर्मचाऱ्यांना पुढे स्वग्राम बदलण्याची कोणतीही संधी उपलब्ध नव्हती. परिणामी, विवाह, बदली, कौटुंबिक परिस्थिती किंवा स्थलांतरामुळे अनेक कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

**महिला कर्मचाऱ्यांना होणार मोठा फायदा**

विशेषतः महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लग्नानंतर कायमस्वरूपी राहण्याचे ठिकाण बदलते. मात्र जुन्या नियमांमुळे त्यांना स्वग्राम बदलता येत नसल्याने अनेक शासकीय सुविधांपासून वंचित राहावे लागत होते. सरकारने ही बाब लक्षात घेत नियमांमध्ये सुधारणा केली आहे. आता लग्न, घटस्फोट, वैधव्य, परित्यक्ता किंवा पुनर्विवाह अशा परिस्थितींमध्ये महिलांना स्वग्राम बदलण्याची अतिरिक्त संधी उपलब्ध होणार आहे.

# जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद

## टँकरने ओलांडली शंभरी; अवघ्या सहा दिवसांत ३१ टँकरांची वाढ

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** वाढत्या उष्णतेमुळे जलस्त्रोत आटू लागले असून भूजलपातळी देखील कमी होत चालल्याने जिल्ह्यात दिवसेंदिवस पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद होत चालले आहे. परिणामी टँकरची मागणी वाढली आहे. अवघ्या सहा दिवसात ३१ टँकर वाढल्याने जिल्ह्यात टँकरने शंभरी पार केली आहे. सध्या जिल्ह्यात १२४ टँकर सुरू आहेत. जिल्ह्यात १२९ गावे ७३८ वाड्यांना १२४ टँकरव्दारे पाणीपुरवठा होत आहे. त्यातून सुमारे २ लाख ३५ हजार ७२८ लोकांची तहान भागविण्यात येत आहे.

गेल्या वर्षी सरासरीपेक्षा १६७ टक्के पाऊस होऊन देखील यंदा पाणीटंचाईची भीषणता अधिक तीव्र होत आहे. गेल्यावर्षी याच तारखेला अवघे ६२ टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू होता. मात्र यावर्षी पाणीटंचाई अधिकच गडद होत चालली आहे. जिल्ह्यात ९ तालुक्यातील १२९ गावे व ७३८ वाड्यांना १२४ टँकरव्दारे पाणीपुरवठा होत आहे. त्यासाठी ४४ ठिकाणच्या विहीरी व बोर अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. त्यात १४ गावांसाठी तर ३० टँकर भरण्यासाठी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. गेल्या आठवड्यात २७ मे रोजी जिल्ह्यात ९३ टँकर सुरू होते. मात्र अवघ्या सहा दिवसात ३१ टँकर वाढले आहेत. सर्वाधिक पाणीटंचाई पारनेर तालुक्यात निर्माण झाली आहे. या तालुक्यातील ३८ गावे ३०३ वाड्यांना ३५ टँकरव्दारे पाणीपुरवठा होत आहे. या तालुक्यात ७१ हजार ६५५ लोकांना टँकरने पाणीवितरण करण्यात येत आहे.

वाढत्या उन्हामुळे व जलस्त्रोत आटल्याने अनेक गाव व वाड्यांना आता टँकरशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्याबरोबर प्रशासनाला देखील टंचाई काळात उपाययोजना करण्यासाठी केवळ टँकरने पाणीपुरवठा करणे हा उपाय राहिल्याने टंचाईग्रस्त गावांना टँकरव्दारे पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, सध्या तरी कोपरगाव, राहुरी, श्रीरामपूर, राहाता, श्रीगोंदा या पाच तालुक्यात अद्यापही टँकर सुरू झालेले नाही.

**तालुकानिहाय गाव, वाड्या व टँकरची संख्या पुढीलप्रमाणे आहे.** संगमनेर– २८ गावे ७१ वाड्या २१ टँकर. (३९ हजार २२६ लोकसंख्या). अकोले– ५ गावे २१ वाड्या ४ टँकर. (७ हजार १०७ लोकसंख्या). नेवासा– १ गाव १७ वाड्या १ टँकर. (२ हजार ३७६ लोकसंख्या). नगर– १५ गावे ६३ वाड्या १५ टँकर. (२३ हजार ५५३ लोकसंख्या). पारनेर– ३८ गावे ३०३ वाड्या ३५ टँकर. (७१ हजार ६५५ लोकसंख्या). पाथर्डी– १६ गावे ७६ वाड्या २३ टँकर. (४० हजार ९५१ लोकसंख्या). शेवगाव– १० गावे ५२ वाड्या ७ टँकर. (१४ हजार ९७ लोकसंख्या). कर्जत– १३ गावे १०१ वाड्या ११ टँकर. (२४ हजार २०३ लोकसंख्या). जामखेड– ३ गावे ३ वाड्या ३ टँकर. (७ हजार ५६० लोकसंख्या). पारनेर नगरपंचायत हद्दीत ३१ वाड्यांना ४ टँकर सुरू आहेत. (५ हजार लोकसंख्या).

# केवायसी न केलेल्या महिला लाडकी बहीण योजनेतून बाद

## पाच लाख सरकारी कर्मचारी लाभार्थी- मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत केवायसी पूर्ण न केलेल्या महिलांना यापुढे लाभ दिला जाणार नाही. मात्र, निकष पूर्ण करत पात्र ठरलेल्या सुमारे १ कोटी ७० लाख महिलांना योजनेचा लाभ नियमितपणे मिळत राहील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली. महाराष्ट्राप्रमाणे देशातील इतर कोणत्याही राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांना थेट आर्थिक मदत दिली जात नसून ही देशातील सर्वात मोठी महिला कल्याण योजना असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

दरम्यान, आयकर विभाग, सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन पोर्टल, चारचाकी वाहन मालकीची माहिती, शिधापत्रिका आदी नोंदींची तुलना करण्यात आली. या प्रक्रियेत सुमारे पाच लाख सरकारी कर्मचारी लाभ घेत असल्याचे आढळले. याशिवाय तर १४ हजार पुरुष लाभार्थी ठरल्याचे समोर आले. या पुरुष लाभार्थ्यांनी घेतलेली रक्कम शासन वसूल करणार आहे. तसेच जवळपास दहा लाख लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील तब्बल ८० लाख महिलांना ई-केवायसी प्रक्रियेनंतर अपात्र करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या पार्श्वभूमीवर आज पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी योजनेची वस्तुस्थिती सांगत गोंधळावर पडदा टाकला. योजना सुरू करताना महिलांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ लागणार असल्याने स्व-घोषणापत्राच्या आधारे अर्ज स्वीकारण्यात आले होते. मात्र लेखापरीक्षणासाठी लाभार्थ्यांची पात्रता तपासणे आवश्यक होते. यासाठी राज्य सरकारने केवायसी मोहीम राबवून विविध विभागांच्या डेटाबेसशी माहितीची पडताळणी केली. परंतु, गेल्या नऊ महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही अनेकांनी केवायसी पूर्ण केली नाही. अर्ज करता येतो पण केवायसी करता येत नाही, हा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे ज्यांनी केवायसी केलेली नाही त्यांनी योजनेचे काही निकष पूर्ण केले नसावेत, असे दिसून येते. त्यामुळे केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांना यापुढे पैसे दिले जाणार नाहीत. मात्र, यापूर्वी त्यांना देण्यात आलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाणार नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# कत्तीचा धाक दाखवत अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न

## पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल; तिघांना अटक, दोघे पसार

**भोकर (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील एका गावात अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी ९ मे रोजी रात्री घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबियांनी दिली होती. त्यानंतर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये एका अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हाही दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना २५ मे रोजी मुलगी पाथर्डी येथे आढळून आली. पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

दरम्यान, मुलगी परत आल्यानंतर काही दिवसांतच एका अल्पवयीन मुलासह चार साथीदारांनी मुलीच्या आई-वडिलांच्या घरी जाऊन गोंधळ घातल्याचा आरोप आहे. आरोपींनी दोन दुचाकींवर येत धारदार शस्त्रांचा धाक दाखवून मुलीला जबरदस्तीने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी कुटुंबियांना शिवीगाळ व मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

आरोपी मुलीला जबरदस्तीने घराबाहेर आणून दुचाकीवर बसवून घेऊन जात असताना कुटुंबियांनी आरडाओरड केली. त्यामुळे परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. नागरिकांनी आरोपींपैकी तिघांना पकडून ठेवले, तर अन्य दोघे शस्त्रांचा धाक दाखवत दुचाकी घटनास्थळीच सोडून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या आजोबांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका अल्पवयीन मुलासह आकाश चंद्रकांत गायकवाड, आकाश राजेंद्र जाधव आणि अन्य दोन अनोळखी व्यक्ती अशा पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांसह शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अरुण धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश डोळे पुढील तपास करीत आहेत.

# धोंडा कार्यक्रमावरून परतताना भीषण अपघात; पती ठार, पत्नी गंभीर जखमी

**वैजापूर (प्रतिनिधी)–** सासुरवाडीत धोंडा कार्यक्रम आटोपून घरी परतणाऱ्या नवदाम्पत्याच्या दुचाकीला रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रँकरची धडक बसल्याने झालेल्या भीषण अपघातात पतीचा मृत्यू झाला, तर पत्नी गंभीर जखमी झाली. ही दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. २) दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास शिऊर बंगला-छत्रपती संभाजीनगर मार्गावरील स्वामीराज मंगल कार्यालयासमोर घडली.

प्रमोद मच्छिंद्र आहेर (वय ३०, रा. नारळा) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव असून, त्यांची पत्नी रूपाली आहेर या गंभीर जखमी झाल्या आहेत. माहितीनुसार, अधिक मासानिमित्त आयोजित धोंडा कार्यक्रमासाठी प्रमोद व रूपाली आहेर हे कन्नड तालुक्यातील शेवता येथे चुलत सासऱ्यांच्या घरी गेले होते. कार्यक्रम आटोपून ते दुचाकीने आपल्या गावी परतत असताना शिऊर बंगल्याजवळ त्यांच्या एमएच-२० जीडी-०२०८ क्रमांकाच्या दुचाकीची रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एमएच-०४ जीआर-११७५ क्रमांकाच्या



ट्रँकरला जोरदार धडक बसली. या अपघातात दोघेही रस्त्यावर फेकले गेले. गंभीर जखमी झालेल्या दाम्पत्याला घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमोद आहेर यांना तपासून मृत घोषित केले. तर गंभीर जखमी असलेल्या रूपाली आहेर यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.

### सुखी संसाराची स्वप्ने अपूर्ण

- प्रमोद आणि रूपाली आहेर यांचा विवाह अवघ्या काही दिवसांपूर्वी, ९ मे रोजी जवळी येथे मामाच्या गावी मोठ्या उत्साहात पार पडला होता. नव्या संसाराची स्वप्ने रंगवत आयुष्याची वाटचाल सुरू केलेल्या या दाम्पत्यावर नियतीने अचानक घाला घातला. या अपघातामुळे आहेर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५...

अहवाल येण्यापूर्वीच मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली. या योजनेच्या अंतर्गत राज्यातील ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा फडणवीस यांनी केली. त्यानुसार काल मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला.

राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्प मुदतीचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जे यासाठी पात्र ठरणार आहे. योजनेसाठी जमीन धारणा क्षेत्राचा विचार केला जाणार नाही. तसेच पुनर्गठित - फेरगठित पीक कर्जालाही योजनेचा लाभ लागू राहील. सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षात नियमित कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान दिले जाईल. यापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही काही अटींसह नव्या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

**चौथी कृषी कर्जमाफी**

यापूर्वी केंद्र सरकारने २००८-०९ च्या अर्थसंकल्पात देशातील शेतकऱ्यांना ७२ हजार कोटींची कर्जमाफी दिली होती. त्यानंतर २०१७मध्ये फडणवीस सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली. त्यापाठोपाठ उद्धव ठाकरे सरकारने २०१९ मध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी घोषित केली होती.

### प्रोत्साहनपर लाभ योजना

- झाली असल्यास अशा शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली मुद्दल व व्याजासह रक्कम ५० हजार रुपये असल्यास अशा शेतकर्यांना ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ तीन आर्थिक वर्षांपैकी, कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० जूनपूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार वेळेत कर्जाची परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. तथापि, अशा पात्र शेतकऱ्यांनी चालू आर्थिक वर्षात अल्प मुदत पीक कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील मुदतीत परतफेड करणे अनिवार्य असेल.

## नगरसेवक, झेडपी सदस्य...

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एमआयडीसी, एस.टी. महामंडळ, इत्यादी) आणि अनुदानित संस्थांचे अधिकारी व कर्मचारी (ज्यांचा एकत्रित मासिक पगार रु. २५,०००/- पेक्षा जास्त आहे, असे व्यक्ती). बिगर-शेती स्त्रोतांपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर आयकर भरणारे व्यक्ती.

ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु. २५,०००/- पेक्षा जास्त आहे, असे निवृत्तीवेतनधारक (माजी सैनिकांना वगळून).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मखध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. आणि सहकारी दूध संघ यांचे पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळ), अधिकारी आणि कर्मचारी-विशेषतः ज्यांचा एकत्रित पगार रु. २५,०००/- पेक्षा जास्त आहे, असे व्यक्ती; तथापि, सहकारी साखर कारखान्यांमधील हंगामी कामगारांना या योजनेसाठी अपात्र मानले जाणार नाही.

**योजना अंमलबजावणीसाठी व बँकासोबत वाटाघाटीसाठी सचिवस्तरीय समिती**

योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती काम करेल. तसेच राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका व ग्रामीण बँकांकडील शेतकर्यांच्या पीक कर्ज/पुनर्गठित अनुत्पादित कर्जांना कर्जमुक्तीचा लाभ देत असताना अनुत्पादित कर्जाच्या तारखेनुसार कर्ज खतावणी शिल्लकेला निश्चित केलेल्या टक्केवारीप्रमाणे सूट देण्याची रक्कम निश्चित केली जाईल. यासाठी बँकासोबत वाटाघाटी करुन सूट देण्याची रक्कमेचे प्रमाण निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली, प्रधान सचिव (सहकार), व्यवस्थापकीय संचालक (महा-आयटी), प्रशासक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांची समिती काम करेल. ही योजना राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जास तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांनी त्यांच्या स्वत:च्या निधीतून वितरित केलेल्या कर्जांना देखील लागू राहील. यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण केले जाईल. तसेच, ॲग्रीस्टॅक आधार सामग्री मंचावर शेतकऱ्यांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. योजनेच्या कार्यान्वयनासाठी अद्ययावत पोर्टल विकसित करण्यात येईल.

## ड्रोन विरोधात पोलिसांची...

राहुरी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत.

प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे नागरिकांमधील भीतीचे वातावरण काही प्रमाणात कमी झाले असले, तरी या ड्रोनमागील नेमका सूत्रधार कोण, त्यांचा उद्देश काय आणि रात्रीच्या वेळीच ते उड्डाण का करत आहेत, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. तज्ज्ञांच्या मते, संबंधित ड्रोन ताब्यात घेणे किंवा निष्क्रिय करण्यात यश आल्यास त्यांच्या मालकांची ओळख आणि उड्डाणामागील हेतू स्पष्ट होऊ शकतो. दरम्यान, स्थानिक पोलिस प्रशासनाने बेकायदेशीर ड्रोनविरोधातील तपास आणि शोधमोहीम अधिक तीव्र केली असून आवश्यकतेनुसार आणखी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तयारी सुरू आहे. दुसरीकडे, ड्रोनच्या हालचाली कमी झाल्या असल्या तरी या प्रकरणाबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तनपुरे विरूध्द ससाणे चर्चेत

आहेत. छाननी प्रक्रियेनंतर निवडणुकीच्या मैदानात सध्या पाच उमेदवार कायम असले तरी प्रत्यक्ष राजकीय समीकरणे माघारीच्या अंतिम मुदतीनंतरच स्पष्ट होणार आहेत. विविध पातळीवर सुरू असलेल्या चर्चांमुळे काही उमेदवार माघार घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अंतिम रिंगणात किती उमेदवार राहतील, निवडणूक रंगतदार होईल की बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा होईल, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतदानाची पध्दत लागू असते. त्यामुळे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोर पक्षचिन्ह नसते. उमेदवारांची नावे राष्ट्रीय पक्ष, राज्य पक्ष आणि स्थानिक पक्ष अशा श्रेणीनुसार छापली जातात. अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर निवडणुकीच्या अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट होणार असून, पुढील दोन दिवसांत राजकीस हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. त्यामुळे ४ जून हा दिवस या निवडणुकीसाठी निर्णायक ठरणार आहे.

## शिंदे सेना ही अमित शहांची...

११२ रुपयांना पेट्रोल मिळते, मग आता थंड व्हायचं की गरम व्हायचं? घुमना आहे की झुमना आहे? मोदींच्या ममन की बातफ्रर टीका करताना ते म्हणाले की, पेपरफुटीवर बोलण्याऐवजी ते पाणी जास्त पिण्याचा सल्ला देतात, तर आरएसएसमध्ये एक लिटर पाण्यात आंघोळीचे प्रशिक्षण दिले जाते. लाडकी बहीण योजनेवरून त्यांनी आरोप केला की, ८० लाख बहिणी अपात्र ठरल्या असून भाऊ बनण्याच्या स्पर्धेत १७ हजार कोटी बेकायदेशीर वाटले गेले. ही निवडणूक रद्द करून तत्कालीन मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची संपत्ती जप्त करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच विखे पाटलांनी शिवसेनेच्या नादाला लागू नये, असा इशारा राऊत यांनी दिला.

माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर बोट ठेवत, नीट पेपरफुटीवरून केंद्रीयमंत्री धर्मेंद्र प्रधान याच्यावर टीका केली. माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अहिल्यानगरमधील रस्ते व शिक्षणाच्या दुरावस्थेवरून सत्ताधाऱ्यांना दे माय धरणी ठाय करण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यात सहसचिव प्रवीण महाले यांनी एसआयआर विषयी, तर सोनल संजय शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा व पेपरफुटीवर परखड मते मांडली. मेळाव्याला आमदार सुनील शिंदे, जिल्हाध्यक्ष सचिन कोते, राजेंद्र दळवी, जगदीश चौधरी, संजय शिंदे, सुहास वहाडणे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अमर कतारी यांनी केले. भाऊसाहेब वाकचौरे हे शिर्डी संस्थानचे कार्यकारी अधिकारी असताना, मी स्वतः त्यांना राजकारणात आणले आणि शिवसेनेची वाट दाखवली. शिवसेनेच्या ताकदीवरच ते खासदार झाले. मात्र, यापूर्वीही काँग्रेसच्या संपर्कात गेल्यामुळे त्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला होता. आता पुन्हा ठाकरे गटाकडून खासदार झाल्यानंतर त्यांनी निष्ठावंत शिवसैनिकांकडे आणि आजच्या महत्त्वाच्या मेळाव्याकडे पाठ फिरवली आहे. ते सध्या विरोधी गटाच्या (शिंदे सेना) संपर्कात असून, ते तिकडे गेल्यात जमाच आहेत, अशी चिन्हे दिसत आहेत. माझी त्यांना जाहीर विनंती आहे की, त्यांनी जाऊ नये; शेवटी त्यांची मर्जी, पण हे बरोबर नाही

**-चंद्रकांत खैरे** (माजी खासदार व शिवसेना नेते)

## मान्सूनचे जिल्ह्यात १५ जूनला...

पावसाची शक्यता अत्यंत कमी आहे. अवकाळी पावसावर शेतीची मशागतीची कामे करता येतील. परंतु जोपर्यंत ७५ ते १०० मिमी चांगला पाऊस पडत नाही आणि जमिनीमध्ये ५ ते ६ इंच खोलीपर्यंत ओलावा जात नाही, तोपर्यंत खरिपाची पेरणी करू नये. कारण यावर्षी सरासरीच्या जवळपास ९० टक्के म्हणजे कमी पाऊस होणार असुन भुजलपातळीत समाधानकारक वाढ होणार नाही. २०१५ मध्ये ८७ टक्के पाऊस झाल्याने दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. यावर्षी जवळपास तिच स्थिती असेल असे सध्याचे चित्र आहे. यावर्षी पडणारा कमी वेळात धुंवाधार आणि नंतर दिर्घकालीन खंड अशा स्वरुपाचा असल्याने पाण्याची कालवा वा तत्सम अशी पर्यायी व्यवस्था नसेल तर दुबार पेरणीचे संकट उद्भवू शकते. एकंदरीत या वर्षासाठी मान्सुन आव्हानात्मक राहाणार आहे यात शंका नाही, असे ही उत्तमराव निर्मळ यांनी सांगितले.

## जलसंपदा विभागाच्या कार्यालय...

घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली आहे, असे म्हटले. तसेच सदरचे प्रकरण दाखल करताना पक्षकाराने कोणताही अभ्यास किंवा कागदपत्रांचे संशोधन केलेले नाही, असे अभिप्राय नोंदवले. याचसोबत, विभागाच्या मंत्र्यांना प्रतिवादी का केले? असा प्रश्नही केला. सदर याचिकेचे कामकाज चालू ठेवण्यासाठी २० लाख रूपये भरावे किंवा याचिका मागे घ्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आणि यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला होता. त्यावर पक्षकाराने याचिका मागे घेत असल्याचे न्यायालयासमोर सांगितले. कार्यालय स्थलांतर करण्याचा महामंडळाचा निर्णय असून, राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी तसेच जलसंपदा विभागाच्या योजनांच्या व निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेला हा धोरणात्मक निर्णय असल्याचे निरीक्षण न्यायालयाने याचिका फेटाळताना नोंदवले. राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ जी. पी. गिरासे, गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या वतीने सीनियर कौन्सिल विनायक होन आणि विधिज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली.

**१ जूनपासून कामकाज सुरू**

महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी १ जूनपासून सुरू झाली आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नेमणुकीच्या कार्यालयांत हजर झाले. मात्र, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनांच्या वतीने विभागाच्या निर्णयाविरोधात आंदोलने सुरू करण्यात आले आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे आता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे क्रमप्राप्त होणार आहे.

## मान्सून केरळच्या दिशेने

आणि आग्नेय अरबी समुद्र, लक्षद्वीप बेटे, केरळ, तामिळनाडू तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये ४ जूनच्या आसपास मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. आयएमडीच्या शास्त्रज्ञ नीता के. गोपाल यांनी सांगितले की, मान्सूनच्या आगमनासाठी आवश्यक वातावरणीय परिस्थिती जवळपास पूर्ण झाली असून ४ जून रोजी मान्सून आगमनाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यांनी सांगितले की, आज संध्याकाळपासून राज्यात चांगल्या पावसाला सुरुवात होईल आणि पुढील सात दिवसांत केरळमधील बहुतांश भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे.त्यांच्या मते, पुढील आठवडाभर राज्यातील सर्व भागांमध्ये पिवळा किंवा नारंगी इशारा लागू राहू शकतो. विशेषतः डोंगराळ भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.